# मेट्रो-३ साठी नेहरू सायन्स सेंटर येथे भुयारीकरण सुरु



सुशील कदम

◆ मुंबई मेट्रो-३ च्या कामाअंतर्गत नेहरू सायन्स सेंटर, आचार्य अत्रे चौक आणि वरळी येथे मेट्रो स्थानकाच्या भुयारीकरणाला नुकतीच सुरुवात झाली आहे. एमएमआरसीचे हे काम पॅकेज ३च्या अंतर्गत असून ते नियोजित वेळेत पूर्ण होईल.

◆ टीबीएम तानसा-१ हे मशीन या भुयारीकरणाला वापरले जात असून, त्याची लांबी ८९ मीटर आहे. वजन तब्बल ४०६ मेट्रिक टन आहे. नेहरू सायन्स सेंटर ते वरळीपर्यंतचे एकूण २.२ किमी अंतरचे भुयार या मशीनद्वारे खोदले जाणार आहे. तसेच या मार्गाचे भुयारीकरण झाल्यानंतर सायन्स सेंटर ते मुंबई सेंट्रल या मार्गाचे भुयारीकरण सुरु होईल.

◆ पॅकेज ३ चे भुयारीकरण हे प्रकल्पाचे मध्यवर्ती भुयारीकरण असून ते ठरलेल्या वेळेत यशस्वीरीत्या पूर्ण होईल, असा विश्वास एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी व्यक्त केला आहे. मुंबई मेट्रो-३ या संपूर्ण प्रकल्पासाठी १७ मशीन काम करणार असून, १६ टीबीएम मशीन्स मुंबईत दाखल झाल्या असून १३ मशीन्स कार्यरत आहेत.